


दैनिक
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

# युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
RNI No. MAHMAR/2007/24252
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ११६। किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शुक्रवार । १५/०५/२०२६ । पाने - ६




# संगमनेर तालुक्यावर अवकाळी संकटाचा कहर

## वादळी पावसाने घेतले दोन बळी; घरांचे, पशुधनाचे आणि शेतीचे मोठे नुकसान

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यात बुधवारी (ता. १३) सायंकाळी अवकाळी पावसासह आलेल्या भीषण वादळी वाऱ्याने अक्षरशः थैमान घालत जनजीवन विस्कळीत केले. अचानक आलेल्या या नैसर्गिक संकटामुळे तालुक्यातील अनेक गावांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून दोन जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. अनेक नागरिक जखमी झाले असून घरांचे, जनावरांच्या गोठ्यांचे, पशुधनाचे तसेच शेतीमालाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अनेक भागातील वीजपुरवठा खंडित झाला असून प्रशासनाकडून पंचनामे सुरू करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

लोहारे येथे सायंकाळी जोरदार वादळी वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली असताना विजांचा कडकडाट सुरू होता. त्याचवेळी लताबाई कैलास सोनवणे (वय ४२) यांच्या अंगावर अचानक वीज पडली. या घटनेत त्या गंभीर जखमी झाल्या. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेत त्यांना उपचारासाठी हलविण्याचा प्रयत्न केला; मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

दरम्यान, डिग्रस येथेही वादळी वाऱ्यामुळे मोठी दुर्घटना घडली. महादू माळी (वय ७०) यांच्या घराची भिंत अचानक कोसळून ती त्यांच्या अंगावर पडली. या घटनेत ते गंभीर जखमी झाले. ग्रामस्थांनी तातडीने मदतकार्य केले; मात्र त्यांचाही मृत्यू झाला.

हजारवाडी येथील घुगे वस्तीवरील काही घरांचे पत्रे वादळामुळे उडून थेट घरातील नागरिकांच्या अंगावर कोसळले. या दुर्घटनेत विजय घुगे, नामदेव घुगे यांच्यासह काही लहान मुले जखमी झाली असून त्यांच्या हातापायांना दुखापत झाली आहे. परिसरातील अनेक घरांचे छप्पर व पत्रे उडून गेल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

(पान ५)







### आमदार अमोल खताळ यांचे प्रशासनाला पंचनाम्याचे निर्देश

संगमनेर तालुक्यात बुधवारी झालेल्या अवकाळी पावसासह वादळी वाऱ्याने मोठे नुकसान झाले. वादळी वाऱ्यामुळे तालुक्यात दोन जणांचा देखील मृत्यू झाला. दोन्ही घटनांची माहिती मिळताच आमदार अमोल खताळ यांनी तात्काळ प्रशासनाशी संपर्क साधून संबंधित कुटुंबांना शासकीय मदत मिळवून देण्याच्या सूचना दिल्या आहेत. नैसर्गिक आपत्तीमुळे मृत्यू झालेल्या दोन्ही कुटुंबांना शासनाकडून प्रत्येकी चार लाख रुपयांची आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा सुरू करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले. नुकसानग्रस्त भागातील पंचनामे तात्काळ करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्याची माहितीही आमदार खताळ यांनी दिली.

## युपीमध्ये वादळी वारे
# ९४ जणांचा मृत्यू

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

देशात दोन प्रकारच्या हवामानाचा अनुभव येत आहे. बुधवारी, प्रयागराज आणि अयोध्यासह उत्तर प्रदेशातील ३० जिल्ह्यांमध्ये वादळामुळे ९४ लोकांचा मृत्यू झाला. प्रयागराजमध्ये सर्वाधिक १७, तर भदोहीमध्ये १६ मृत्यूंची नोंद झाली.

बरेली येथे ताशी ८० किमी वेगाने आलेल्या वादळाने एका तरुणाला आणि पत्र्याच्या शेडला उडवून लावले. राज्यातील बांदा शहरात तापमान ४५.४°C पर्यंत पोहोचले. आज ५१ जिल्ह्यांसाठी तीव्र वादळ आणि पावसाचा इशारा जारी करण्यात आला आहे. राजस्थानमध्येही तीव्र उष्णता आणि उष्णतेची लाट जाणवत आहे. बुधवारी सलग चौथ्या दिवशी जैसलमेर हे देशातील सर्वात उष्ण शहर ठरले, जिथे तापमान ४६.१°C पर्यंत पोहोचले. हवामान विभागाच्या माहितीनुसार, बिकानेर, जोधपूर, जैसलमेर आणि बारमेरमध्ये तीव्र उष्णतेसाठी रेड अलर्ट लागू आहे. १३ जिल्ह्यांसाठी उष्णतेच्या लाटेचा इशारा जारी करण्यात आला आहे.

दरम्यान, मध्य प्रदेशातील २५ हून अधिक जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट पसरली असून, ती १८ मे पर्यंत कायम राहण्याची शक्यता आहे. बुधवारी खजुराहोमध्ये तापमान ४५.४°C होते. आज इंदूर, उज्जैन, धार आणि रतलाममध्ये उष्णतेच्या लाटेसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. या जिल्ह्यांमध्ये रात्री तापमान वाढण्याचीही शक्यता वर्तवण्यात आली आहे. येथे, हरियाणात गेल्या २४ तासांत कमाल तापमानात १.१°C ने वाढ झाली आहे.

## शबरीमला सुनावणीत हिंदुत्वावर सर्वोच्च न्यायालयाचे मोठे निरीक्षण
# अंतकरणातील श्रद्धा म्हणजे हिंदुत्व - सर्वोच्च



मुंबई (वृत्तसंस्था)

सर्वोच्च न्यायालयाने हिंदुत्वाच्या व्याख्येवर आतापर्यंतची सर्वात मोठी आणि ऐतिहासिक टिप्पणी केली आहे. शबरीमला मंदिरासह धार्मिक स्वातंत्र्याच्या मर्यादेवर सुरू असलेल्या सुनावणीत न्यायालयाने 'हिंदुत्व' आणि 'हिंदू' असण्यावर भाष्य केले.

हिंदुत्व ही एक जीवनशैली असून हिंदू व्यक्तीने हिंदू राहण्यासाठी मंदिरात जाणे किंवा कोणताही विशिष्ट धार्मिक विधी करणे आवश्यक नाही. केवळ घरात दिवा लावणेही आपली श्रद्धा सिद्ध करण्यासाठी पुरेसे आहे अशी अत्यंत महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी केली आहे. १५ व्या दिवशी सुनावणी मुख्य न्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील नऊ न्यायाधीशांच्या घटनापीठासमोर ही सुनावणी सुरू आहे. केरळमधील शबरीमला मंदिरासह इतर धार्मिक स्थळांवर महिलांशी होणारा भेदभाव आणि दाऊदी बोहरा समुदायासह विविध धर्मांमधील धार्मिक स्वातंत्र्याच्या मर्यादांशी संबंधित याचिकांवर विचार करत आहे. सुनावणीच्या पंधराव्या दिवशी एका हस्तक्षेपकर्त्याच्या वतीने ज्येष्ठ वकील डॉ. जी. मोहन गोपाल यांनी आपली बाजू मांडली.

वकिलांचा युक्तिवाद आणि हिंदू धर्माची व्याख्या डॉ. गोपाल यांनी युक्तिवाद करताना सांगितले की, धार्मिक समुदायांमध्ये सामाजिक न्यायाची मागणी सातत्याने होत आहे. त्यांनी ऐतिहासिक संदर्भांचा उल्लेख करत म्हटले की, १९६६ मध्ये हिंदू धर्माला धार्मिक श्रेणी म्हणून परिभाषित करण्यात आले होते. तेव्हा असे मानले गेले होते की, हिंदू तोच आहे जो धर्म आणि तत्त्वज्ञानाच्या सर्व बाबींमध्ये वेदांना सर्वोच्च मानतो. परंतु, आज हिंदू म्हणवणारा प्रत्येक व्यक्ती आध्यात्मिक आणि तत्त्वज्ञानाच्या बाबींमध्ये वेदांना खरोखरच सर्वोच्च मानतो का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

'हिंदुत्व ही जीवनशैली' वकिलांच्या या युक्तिवादाला उत्तर देताना न्यायमूर्ती नागरत्ना यांनी स्पष्ट केले की, म्हणूनच हिंदुत्वाला 'जीवनशैली' म्हटले जाते. हिंदू राहण्यासाठी मंदिरात जाणे किंवा कोणताही धार्मिक विधी करणे आवश्यक नाही. त्यांनी पुढे असेही नमूद केले की, कदाचित कोणाला कर्मकांडी असण्याची गरज नाही आणि कोणाच्याही श्रद्धेच्या मार्गात कोणी अडथळा आणू शकत नाही.यावर मुख्य न्यायाधीशांनी पुष्टी जोडत म्हटले की, जर एखादी व्यक्ती आपल्या घरात केवळ एक दिवा लावते, तर ते त्याच्या धर्माला सिद्ध करण्यासाठी पुरेसे आहे.

धर्म 'तुटण्याची' भीती आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी सुनावणीदरम्यान न्यायालयाने एक गंभीर इशाराही दिला. जर एखादी व्यक्ती संवैधानिक न्यायालयासमोर प्रत्येक धार्मिक प्रथा किंवा धर्माशी संबंधित लहान-मोठ्या बाबींवर प्रश्न विचारू लागली, तर अशा शेकडो याचिका दाखल होतील आणि त्यामुळे प्रत्येक धर्म 'तुटेल', असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

# इंधन बचतीचा संदेश
## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दुचाकीवरून विधान भवनात



मुंबई (वृत्तसंस्था)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच देशवासीयांना इंधन बचतीचे आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वांनाच चकित केले. मुख्यमंत्री फडणवीस चक्क 'रॉयल एनफिल्ड ३५०' या दुचाकीवरून विधान भवनात दाखल झाले. त्यांच्यासोबत सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार आणि मुख्यमंत्र्यांचा संपूर्ण सुरक्षा ताफादेखील दुचाकीवरच होता. इंधन बचत आणि साधेपणाचा संदेश देण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी उचललेल्या या पावलाची सध्या राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे.

यावेळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठी घोषणा केली. ते म्हणाले की, पंतप्रधानांनी जे काही निर्देश दिले आहेत ते देशहिताकरिता आहेत. त्यामुळे आपापल्या परीने जे जे करता येईल त्यासाठी आम्ही सगळे प्रयत्न करत आहोत.









# अ‍ॅट्रॉसिटी कायद्यावर सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वपूर्ण स्पष्टीकरण

मुंबई (वृत्तसंस्था)

जातीय शिवीगाळ प्रकरणांमध्ये अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याची नेमकी मर्यादा काय आहे, यावर सर्वोच्च न्यायालयाने नुकत्याच दिलेल्या एका निर्णयातून महत्त्वपूर्ण भाष्य केले आहे. कौटुंबिक वाद, घराच्या आत घडलेली घटना आणि त्यानंतर दाखल झालेला अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा या पार्श्वभूमीवर न्यायालयाने काही महत्त्वाचे निकष स्पष्ट केले आहेत. न्यायमूर्ती प्रशांतकुमार मिश्रा आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. एखाद्या खासगी घराच्या चार भिंतींच्या आत इतर कोणीही उपस्थित नसताना झालेली कथित जातिवाचक शिवीगाळ किंवा अपमान हा अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा मानला जाऊ शकत नाही असा महत्त्वपूर्ण निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, अ‍ॅट्रॉसिटी कायद्याच्या कलम ३(१)(र) आणि ३(१)(स) अंतर्गत गुन्हा नोंदवण्यासाठी जातिवाचक अपमान किंवा शिवीगाळ ही लोकांच्या नजरेसमोर घडलेली असणे आवश्यक आहे. न्यायालयाच्या मते, जर एखादी घटना सार्वजनिक ठिकाणी घडली असेल आणि उपस्थित लोक आरोपीने वापरलेले अपमानास्पद शब्द प्रत्यक्ष ऐकू किंवा पाहू शकत असतील, तरच त्या घटनेला कायद्याअंतर्गत गुन्हा मानले जाऊ शकते. जर कथित घटना एखाद्या खासगी घराच्या आत घडली आणि त्या ठिकाणी अन्य कोणीही उपस्थित नसेल तर ती घटना लोकांच्या नजरेसमोर घडली असे मानता येणार नाही असे न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले. खासगी जागाही काही परिस्थितीत सार्वजनिक मानली जाऊ शकते. सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात आणखी एक महत्त्वाचे स्पष्टीकरण दिले. एखादी घटना खासगी ठिकाणी घडली असली, तरी ती इतर लोकांना प्रत्यक्ष दिसू किंवा ऐकू येत असेल तर त्या ठिकाणाला लोकांच्या नजरेसमोर असल्याचे मानले जाऊ शकते.

# कासारा दुमाला येथे सर्व्हिस रस्त्याअभावी नागरिक त्रस्त

## आमदार खताळ यांचे महामार्ग प्राधिकरणाला निर्देश

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर-संगमनेर शहरालगतच्या कासारा दुमाला शिवारातील नाशिक-पुणे राष्ट्रीय महामार्गावर सर्व्हिस रस्ता नसल्यामुळे स्थानिक नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याच्या व्यथा परिसरातील नागरिकांनी आमदार खताळ यांच्यासमोर मांडल्या. यानंतर त्यांनी पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाच्या प्रोजेक्ट मॅनेजर यांना तातडीने सर्व्हिस रस्ता तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

कासारा दुमाला शिवारातील अकोले रोड चौफुलीच्या पूर्वेकडील भागात सुमारे ३५० लोकसंख्या वास्तव्यास आहे. नाशिक-पुणे राष्ट्रीय महामार्ग बांधकामावेळी वस्तीमधूनच रस्ता गेल्याने वस्ती दोन भागांत विभागली गेली आहे. नियमानुसार अशा चौफुलीच्या ठिकाणी दोन्ही बाजूंना सर्व्हिस रस्त्याची सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असते, जेणे करून स्थानिक नागरिकांना सुरक्षित पणे महामार्गावर ये-जा करता येईल. आणि पुणे नाशिक राष्ट्रीय महामार्गाने येणाऱ्या वाहनांना सुद्धा कुठलाही अडथळा होणार नाही याची महामार्ग विभागाने दक्षता घ्यावी अशी मागणी करण्यात



आली आहे

पूर्वेकडील बाजूस आजपर्यंत सर्व्हिस रस्ता तयार करण्यात आलेला नाही. याबाबत अनेक वेळा संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करूनही आज करू, उद्या करू अशी आश्वासने देत नागरिकांची फसवणूक करण्यात आल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. सध्या या मार्गावर सिमेंट काँक्रीटीकरणाचे काम सुरू असून, काम पूर्ण झाल्यानंतर वाहनांचा वेग आणखी वाढणार असल्याने अपघाताचा धोका अधिक गंभीर बनला आहे.

सर्व्हिस रस्ता नसल्यामुळे नागरिकांना थेट महामार्गावर चढावे लागत असून, अनेकदा वाहतूक नियमांचे उल्लंघन करून विरुद्ध दिशेने जावे लागते. त्यामुळे या परिसरात अपघातांचे प्रमाण वाढले असून जीवितहानीच्या घटनाही घडल्या आहेत. शालेय विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यास, रुग्णांना शहरातील दवाखान्यांमध्ये वेळेत पोहोचण्यास तसेच आपत्कालीन परिस्थितीत पोलीस व इतर यंत्रणांना घटनास्थळी पोहोचण्यास मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. या परिसरात वालझाडे वस्ती, भिल्ल वस्ती तसेच सय्यद बाबा दर्गा असून सर्वधर्मीय भाविक आणि नागरिक मोठ्या संख्येने या ठिकाणी ये-जा करतात. त्यामुळे सर्व्हिस रस्ता निर्माण करणे ही केवळ स्थानिकांची मागणी नसून सार्वजनिक सुरक्षेची अत्यंत महत्त्वाची गरज असल्याचे नागरिकांनी स्पष्ट केले आहे.

# बस स्थानकांवरील स्वच्छतागृहे 1 जूनपासून मोफत - परिवहन मंत्री



मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यात खासगी प्रवासी बस वाहतुकीदारांकडून केली जाणारी बेकायदेशीर दरवाढ आणि अनधिकृत मोबाईल ॲप्सद्वारे प्रवाशांची होणारी आर्थिक पिळवणूक याबाबत गेल्या अनेक दिवसांपासून प्रवाशांकडून तक्रारी येत आहेत. याबाबत आता शासनाने गंभीर दखल घेतली आहे. तसेच या बैठकीत १ जूनपासून महामंडळाच्या सर्व बसस्थानकावरील स्वच्छतागृहे मोफत करण्याचा निर्णयही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतला आहे.

या संदर्भातील तक्रारींचे निराकरण करण्यासाठी तसेच दीर्घकालीन उपाययोजना सुचविण्यासाठी सह परिवहन आयुक्त आणि सुराज्य अभियानातील तीन प्रतिनिधींचा समावेश असलेली विशेष समिती गठित करण्याचे महत्त्वपूर्ण निर्देश मंत्रालयात आयोजित बैठकीत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत.

या बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, अपर परिवहन आयुक्त भरत कळसकर तसेच सुराज्य अभियान संघटनेचे अभिषेक मुरुकटे, अरविंद पानसरे, सुनील हनवट आदी उपस्थित होते. गठित समिती खासगी बसच्या भाडेवाढीवर नियंत्रण मिळवणे, अवैध बुकिंग प्सना आळा घालणे आणि प्रवाशांच्या तक्रारींवर प्रभावी उपाययोजना सुचविणे याबाबत सविस्तर अहवाल सादर करेल. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील बैठकीचे आयोजन करण्यात येईल. समितीने सुचविलेल्या उपाययोजनांची राज्य सरकारकडून प्रभावी आणि तातडीने अंमलबजावणी केली जाईल असे आश्वासन सरनाईक यांनी दिले आहेत.

# युरियाचा वापर कमी करत उत्पादन वाढवणे गरजेचे - डॉ. अशोक ढगे

युवावार्ता (प्रतिनिधी)

नेवासा - आंतरराष्ट्रीय स्तरावरील युद्धजन्य परिस्थितीमुळे रासायनिक खतांचा संभाव्य तुटवडा जाणवू शकतो. त्यामुळे युरिया खताचा वापर कमी करूनही अधिक कार्यक्षम पद्धतीने उत्पादन वाढविणे ही अशोक ढगे काळाची गरज - असल्याचे प्रतिपादन कृषी तज्ज्ञ डॉ. अशोक ढगे यांनी केले. नेवासा तालुक्यातील प्रवरासंगम शिवोरात आयोजित शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी परिसरातील अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. ढगे म्हणाले, महाराष्ट्रातील अनेक



भागांमध्ये शेतकरी मोठ्या प्रमाणावर युरियाची मागणी करतात. मात्र, युरियाचा योग्य पद्धतीने वापर न झाल्याने त्याचा अपव्यय होतो. युरिया थेट मातीत देण्यापेक्षा तीन किलो युरिया १०० लिटर पाण्यात विरघळून फवारणी केल्यास पिकांना चांगला प्रतिसाद मिळतो तसेच सकाळच्या वेळेत युरिया दिल्यास त्याचा अधिक फायदा होतो अनेक शेतकरी दुपारच्या उन्हात खतांचा वापर करतात, त्यामुळे उष्णतेमुळे युरियाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होतो असे त्यांनी स्पष्ट केले.

युरियामध्ये झिंक कोटेड, सल्फर कोटेड व नॅनो युरियाचा वापर केल्यास पिकांना अधिक फायदा होतो. तसेच युरियाचा वापर एकाच वेळी न करता विभागून दोन टप्प्यांत करावा. लागवडीच्या वेळी व त्यानंतर एक महिन्याने दिल्यास त्याची कार्यक्षमता वाढते. एकदम जास्त प्रमाणात युरिया दिल्यास पाण्यावाटे किंवा सूर्याच्या उष्णतेमुळे त्याचा ऱ्हास होऊन खर्च वाया जातो, असेही त्यांनी सांगितले. उसासारख्या उंच पिकांमध्ये ड्रोनद्वारे युरियाची फवारणी केल्यास खताच्या खर्चात बचत होते. जमिनीतील सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण वाढविल्यास युरियाची गरज कमी होते. त्यासाठी ताग, धैंचा यांसारखी हिरवळीची खते घेणे फायदेशीर ठरते. तसेच चांगल्या कुजलेल्या शेणखतात युरिया मिसळून वापरल्यासही चांगले परिणाम मिळतात, असे मार्गदर्शन डॉ. ढगे यांनी केले. युरिया कमीत कमी वापरून अधिक उत्पादन घेण्यासाठी शेतकऱ्यांनी कार्यक्षम आणि शास्त्रीय पद्धतींचा अवलंब करावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

सेंद्रीय पदार्थांचे प्रमाण वाढवल्यास युरियाची गरज कमी उसासारख्या उंच पिकांमध्ये ड्रोनद्वारे युरियाची फवारणी केल्यास खताच्या खर्चात बचत होते. जमिनीतील सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण वाढविल्यास युरियाची गरज कमी होते. त्यासाठी ताग, धैंचा यांसारखी हिरवळीची खते घेणे फायदेशीर ठरते. तसेच चांगल्या कुजलेल्या शेणखतात युरिया मिसळून वापरल्यासही चांगले परिणाम मिळतात, असे मार्गदर्शन डॉ. ढगे यांनी केले.

# साखर निर्यात बंदीचा निर्णय तातडीने मागे घ्यावा : किसान सभा

युवावार्ता (प्रतिनिधी)

केंद्र सरकारने साखरेच्या निर्यातीवर बंदी लादणारा निर्णय जाहीर केला आहे. महाराष्ट्रातील व देशभरातील साखर उद्योगावर अत्यंत प्रतिकूल परिणाम करणारा वऊस उत्पादक शेतकऱ्यांना आणखीन संकटात ढकलणारा हा निर्णय आहे. साखरेचे किमान विक्री मूल्य गेले अनेक वर्ष मागणी करूनही वाढवण्यात न आल्यामुळे अगोदरच साखर उद्योग संकटात सापडला आहे. वाढत्या प्रक्रिया खर्चाचा परिणाम व साखरेला योग्य भाव न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचे एफआरपीचे पैसे सुद्धा अनेक कारखान्यांना देता येणार नाहीत अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा पार्श्वभूमीवर साखरेचे किमान विक्री मूल्य वाढवून साखर निर्यातीला प्रोत्साहन देण्याची आवश्यकता होती. या ऐवजी नियंत्रित हा शब्द हटवून प्रतिबंधित हा शब्द टाकत केंद्र सरकारने साखरेच्या निर्यातीला संपूर्णपणाने बंदी जाहीर केली आहे.

आंतरराष्ट्रीय पातळीवर भूराजकीय समस्येमुळे अनेक ऊस उत्पादक देश साखरे ऐवजी इथेनॉल निर्मितीकडे वळले आहेत. यामुळे काही प्रमाणामध्ये साखर निर्यातीला संधी उपलब्ध झाली आहे. या संधीचा लाभ उठवत भारतातील व महाराष्ट्रातील साखर उद्योगाला संजीवनी देण्याची आवश्यकता होती. सरकारने याउलट निर्यात बंदी लादून शेतकऱ्यांच्या पायात असणाऱ्या बेड्या आणखीन घट्ट केल्या आहेत.

केंद्र सरकारने साखर उद्योगाला वाचवण्यासाठी तातडीने निर्यात बंदी उठवावी. साखर निर्यातीला प्रोत्साहन द्यावे. साखर विक्री मूल्यांमध्ये ठोस वाढ करावी. आंतरराष्ट्रीय इंधन संकट पाहता इथेनॉल निर्मितीला मोठ्या प्रमाणात चालना द्यावी. ज्या देशांमध्ये इंधन संकटाचा परिणाम म्हणून साखर निर्मिती सीमित करण्यात आलेली आहे अशा देशांबरोबर संपर्क करत व साखर निर्यातीच्या इतर आणखी शक्यता शोधत निर्यात केंद्री धोरणाची अंमलबजावणी करावी व भारतीय शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी किसान सभा करत आहे.

देशभरात नुकत्याच पार पडलेल्या गळीत हंगामामध्ये साखरेचे उत्पादन चांगल्या प्रकारे झाले आहे. महाराष्ट्राने यावेळी इतर राज्यांवर आघाडी घेत साखर उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढवले आहे. मागील वर्षाचा सुद्धा साखर साठा अद्याप शिल्लक आहे. यावर्षीची ऊस लागवड सुद्धा पुरेशी असणार आहे. अशा पार्श्वभूमीवर येऊ घातलेल्या गळीत हंगामात सुद्धा साखरेचे उत्पादन योग्यरीत्या पार पडणार आहे. अशा पार्श्वभूमीवर साखरेची टंचाई नसताना व आंतरराष्ट्रीय परिस्थितीमुळे शेतकऱ्यांना दोन पैसे मिळण्याची परिस्थिती निर्माण झाली असताना अशाप्रकारे निर्यात बंदीचा आत्मघाती निर्णय घेऊन साखर उद्योगाला आणखीन संकटात टाकणे सर्वथा गैर आहे. केंद्र सरकारने आपल्या निर्णयाचा पुनर्विचार करून तातडीने निर्यात बंदी उठवण्याची अशी मागणी डॉ अशोक ढवळे, जे. पी. गावित, डॉ. अजित नवले उमेश देशमुख यांनी केली आहे.

## निर्यात बंदी - सरकारची भूमिका

**अमेरिका-इराणमधील संघर्षामुळे पश्चिम आशियात तणाव निर्माण झालेला आहे. या तणावाचा जगातील अनेक देशांवर मोठा परिणाम होत आहे. कारण होर्मुझ सामुद्रधुनीमधून होणाऱ्या कच्च्या तेलाच्या व्यापाराला आणि जागतिक व्यापारासह निर्यातीला देखील अडथळे निर्माण होत असल्याने याचा फटका भारतासह अनेक देशांना बसत आहे. या पार्श्वभूमीवर भारताने महत्वाच्या उपाययोजना करण्यास सुरूवात केली आहे.केंद्र सरकारने साखर निर्यातीवर तत्काळ बंदी घातली आहे. हा निर्णय आजपासूनच लागू झाला असून ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत किंवा पुढील आदेशापर्यंत ही निर्यातबंदी कायम राहणार आहे. देशांतर्गत साखरेचे दर नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि साखरेचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी हा निर्णय घेतला आहे. जागतिक बाजारपेठेत साखरेच्या किमतीत सातत्याने वाढ होत आहे. याचा परिणाम भारतीय बाजारपेठेवर होऊन साखरेचे दर वाढू नयेत, यासाठी सरकारने हे पाऊल उचलले आहे. साखरेचा समावेश आता 'निर्बंधात्मक' श्रेणीतून काढून 'प्रतिबंधित' श्रेणीत करण्यात आला आहे. अमेरिका आणि युरोपियन युनियन या देशांना विशेष कोठ्यांतर्गत होणारी साखर निर्यात सुरू राहणार आहे.**

# ट्रम्प यांनी युद्ध थांबवण्याचा प्रस्ताव फेटाळला

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या नवीन शांतता प्रस्तावाला फेटाळून लावले आहे. ट्रम्प यांनी ट्रुथ सोशलवर लिहिले, मी इराणच्या प्रतिनिधींचे उत्तर वाचले. मला ते अजिबात आवडले नाही. ते स्वीकारले जाऊ शकत नाही. यापूर्वीही ट्रम्प यांनी इराणवर खेळ खेळल्याचा आरोप केला होता.

इराणच्या सरकारी माध्यमांनुसार, तेहराननेे रविवारी पाकिस्तानमार्फत अमेरिकेला आपला नवीन प्रस्ताव पाठवला. अहवालानुसार, या प्रस्तावात युद्ध संपवणे, पर्शियन गल्फ आणि होर्मुजच्या सामुद्रधुनीमध्ये सागरी सुरक्षा सुनिश्चित करणे, निर्बंध हटवणे आणि अणुकार्यक्रमावर चर्चा करण्याची मागणी करण्यात आली होती. अमेरिकेने या आठवड्यात इराणला १४ कलमी प्रस्ताव पाठवला होता. यानुसार, इराणला किमान १२ वर्षांसाठी युरेनियम संवर्धन थांबवावे लागेल आणि त्याच्याकडे असलेले सुमारे ४४० किलो ६०% समृद्ध युरेनियम अमेरिकेला सोपवावे लागेल. या बदल्यात अमेरिका निर्बंध शिथिल करेल, इराणची गोठवलेली अब्जावधी डॉलर्सची मालमत्ता मुक्त करेल, तसेच इराणी बंदरांवरील नौदल नाकेबंदी हटवेल.

# नाशिक विभागात युरिया खताचा 1120 कोटी रूपयांचा काळाबाजार

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक- नाशिक विभागात अनुदानित युरिया खताच्या काळाबाजाराचे गंभीर प्रकरण समोर आले आहे. खरीप आणि रब्बी हंगामात तब्बल ११२० कोटी रुपयांच्या सबसिडीच्या युरियाचा काळाबाजार होत असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. शासन शेतकऱ्यांना मदत म्हणून युरिया खतावर मोठ्या प्रमाणात अनुदान देते; मात्र यातील मोठा हिस्सा काळ्या बाजारात वळवला जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहेमिळालेल्या माहितीनुसार, नाशिक विभागात दरवर्षी सुमारे ३ लाख ५० हजार मेट्रिक टन युरियाची गरज असते. एका टन युरियामागे शासन सुमारे ४० हजार रुपये सबसिडी देते. त्यानुसार या विभागासाठी शासनाचा एकूण अनुदान खर्च सुमारे १४०० कोटी रुपये इतका होतो. यातील तब्बल ८० टक्के युरिया काळ्या बाजारात जात असल्याची चर्चा असून, केवळ २० टक्के युरियाच प्रत्यक्ष शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत असल्याचे सांगितले जात आहे.

कमी पर्जन्यमान आणि दुष्काळी तालुक्यांत हा प्रकार अधिक प्रमाणात होत असल्याचे समोर येत आहे. प्रत्यक्ष मागणी कमी असतानाही काही विक्रेते मोठ्या प्रमाणात युरियाची उचल करतात. त्यानंतर शेतकऱ्यांच्या नावावर कागदोपत्री विक्री दाखवून हा साठा इतर भागांत जादा दराने विकला जात असल्याचा आरोप आहे. नांदगाव, येवला, सिन्नर आणि मालेगाव तालुक्यांत हा प्रकार मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याची चर्चा कृषी विभागात रंगली आहे. नाशिक विभागात कृषी सहसंचालक कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात सुमारे ८३०० खत विक्री केंद्रे आहेत. मात्र या केंद्रांच्या तपासणीसाठी अवघे ८० निरीक्षक कार्यरत आहेत. एका तालुक्याला केवळ दोन निरीक्षक असल्याने तपासणी यंत्रणेवर मोठा ताण आहे. विक्री केंद्रांची संख्या जास्त आणि शासकीय निरीक्षकांची संख्या कमी असल्याने युरियाच्या काळाबाजार करणाऱ्या रॅकेटला याचा फायदा होत असल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे, निरीक्षकांना दोषी विक्रेत्यांवर थेट कारवाई करण्याचा अधिकारही नसल्याचे समोर आले आहे.दरम्यान, युरियाचा काळाबाजार रोखण्यासाठी तेलंगणा राज्याने वेगळे मॉडेल स्वीकारले आहे. तेथे युरिया खताची संपूर्ण विक्री व्यवस्था शासनाच्या ताब्यात देण्यात आली असून खासगी विक्रेत्यांना युरिया विक्रीस बंदी घालण्यात आली आहे.

# नगर शहरात भोंदूबाबाला अटक, घराखालील गुप्तधन काढून देण्याच्या नावाखाली घातला गंडा

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- शहरात अंधश्रद्धेच्या नावाखाली मोठी फसवणूक उघडकीस आली आहे. घराखालील गुप्तधन काढून देण्याच्या आमिषाने एका भोंदूबाबाने महिलेकडून ५० हजार रुपये घेवून जादूटोणा, अघोरी विद्या केल्याचे दाखवत गुप्तधनही काढून दिले नाही आणि घेतलेले पैसेही परत न देता फसवणूक केली आहे. या प्रकरणी १२ मे रोजी रात्री उशिरा तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्या भोंदू बाबाला पोलिसांनी अटक केली आहे. शिव अण्णासाहेब सोनवणे (रा.रंगभवन जवळ, सर्जेपुरा) असे या भोंदूबाबाचे नाव आहे.

याबाबत सोनाली महेश काळोखे (रा.रंगभवन जवळ, सर्जेपुरा) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्या घराजवळच राहणारा भोंदूबाबा शिव सोनवणे याने फिर्यादी व त्यांच्या कुटुंबाला तुमच्या घराखाली मोठ्या प्रमाणात सोन्याचे गुप्तधन आहे. ते जादूटोणा आणि अघोरी विद्या करून काढून देतो असे आमिष दाखवले. त्यासाठी त्यांच्याकडून ५० हजार रुपये रोख स्वरुपात घेतले. या भोंदूबाबाच्या भूलथापांना बळी पडून फिर्यादीच्या कुटुंबीयांनी घर पाडले. त्यानंतर या भोंदू बाबाने त्या जागेत लिंबू, मानवी कवटी, हाडे, हळद, कुंकू, भस्म अशी पूजा मांडून मोठमोठ्याने मंत्र उच्चारून अघोरी विधी केला. परंतु कुठलेही गुप्तधन मिळवून न देता आणि घेतलेले ५० हजार रुपये न देता फसवणूक केली. तसेच आता ही जागा माझी आहे. तुम्ही जर माझ्या नादाला लागले तर



तुमच्यावर अघोरी प्रयोग करून तुम्हाला संपवून टाकील अशी धमकी दिली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.या फिर्यादी वरून पोलिसांनी भोंदूबाबा शिव अण्णासाहेब सोनवणे याच्या विरुद्ध बीएनएस कलम ३१८ (४), ३५१ (२) सह महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध व त्याचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३ चे कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच पोलिस निरीक्षक जगदीश भांबळ आणि गुन्हे शोध पथकाने भोंदूबाबा शिव सोनवणे याला रात्रीच अटक केली आहे.

दरम्यान भोंदू बाबा शिव सोनवणे याने गुप्तधनाच्या आमिषाने काळोखे कुटुंबाला घर पाडायला लावले. त्यांची आर्थिक फसवणूक केली. तसेच जागा बळकावण्यासाठी कुटुंबीयांना ११ मे रोजी रात्री १०.३० च्या सुमारास लाथाबुक्क्यांनी आणि कुऱ्हाडीच्या दांड्याने बेदम मारहाणही केली आहे. या मारहाण प्रकरणी आणखी एक गुन्हा तोफखाना पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी महेश भास्कर काळोखे (वय २९, रा. रंगभवन, सर्जेपुरा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात शिव अण्णासाहेब सोनवणे, ओम अण्णासाहेब सोनवणे, कोहिनूर अण्णासाहेब सोनवणे (सर्व रा. सर्जेपुरा) आणि यश सागर सोळशे (रा. बोल्हेगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिव सोनवणे आणि इतर आरोपींनी फिर्यादी महेश काळोखे यांना शिवीगाळ करत मारहाण केली. भांडण सोडवण्यासाठी आलेला भाऊ दीपक आणि आई लक्ष्मी यांनाही आरोपींनी कुऱ्हाडीच्या दांड्याने मारहाण करत जखमी केले. तसेच त्यांच्या दुचाकीचेही नुकसान करून जीवे मारण्याची धमकी दिली. या फिर्यादी वरून शिव सोनवणे सह चौघांवर मारहाणीचा व धमकी दिल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.












# सिंहस्थ कुंभ मेळ्यासाठी प्रति आखाडा पाच कोटींचा निधी

## कुंभच्या आयोजनासाठी निधी कमी पडू देणार नाही : मुख्यमंत्री




मुंबई (प्रतिनिधी)-

नाशिक - त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा हा महाराष्ट्रासाठी सेवेचा आदर्श निर्माण करण्याची संधी आहे. आखाड्यांना सर्व सोयी-सुविधा उपलब्ध होण्यासाठी प्रति आखाडा पाच कोटींचा निधी, छोट्या संस्थानसाठी प्रति संस्थान १५ लाख रुपये, आखाड्यांच्या वीज देयकाची प्राधिकरणाच्या माध्यमातून अदायगी, आखाड्याची जमीन शासकीय कामासाठी अधिग्रहित केल्यास आखाड्यांना मोबदला किंवा जमीन देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली. कुंभमेळ्यासाठी जगभरातून येणाऱ्या साधू, महंत व भाविक यांची सेवा करीत, त्यांच्या मार्गदर्शनातून कुंभमेळ्याचे भव्य-दिव्य आयोजन करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित सिंहस्थ कुंभमेळा आढावा बैठकीत सांगितले. बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, कुंभ मेळा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पुढील वर्षी होत असलेल्या कुंभमेळ्याचे नियोजन आणि तयारी ही केवळ याच कुंभमेळ्यासाठी नसून, ती पुढील १२ वर्षांनी येणाऱ्या कुंभमेळ्यासाठी असणार आहे. या पद्धतीने आखलेल्या नियोजनाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

कुंभमेळा निमित्ताने आरोग्य व्यवस्थेचाही बृहत आराखडा तयार करण्यात आला आहे. येथे येणाऱ्या प्रत्येक साधू, महंत व भाविक यांना आरोग्य विषयक कुठलीही अडचण होणार नाही, याची परिपूर्ण दक्षता घेण्यात आली आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. आखाड्यांसाठी असलेल्या जमिनीमधील काही क्षेत्र प्रतिबंधित करण्याकरिता निश्चितच विचार करण्यात येईल. मागील कुंभमेळ्यापेक्षा यावेळेच्या आयोजनामध्ये गोदावरी नदीचे स्वच्छ स्वरूप आपणाला सर्वांना दिसणार आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर काम करण्यात येत आहे.

त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी राज्यशासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. हे आयोजन अत्यंत दिमाखदार स्वरूपात पार पडेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त करीत, या कुंभमेळ्याच्या सुरक्षेबाबत कुठलीही तडजोड खपवून घेणार नाही, असेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. भाविकांची सुरक्षा, सुविधा आणि आखाड्यांच्या मागण्यांबाबतही निर्देश दिले. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, कुंभमेळ्यादरम्यान येणाऱ्या भाविकांना किंवा सामान्य नागरिकांना कोणताही त्रास होणार नाही, अशी भूमिका आखाड्यांनी घेतली आहे. शासनाला सेवा करण्याची संधी मिळाली असून, संपूर्ण प्रशासन एक 'टीम' म्हणून काम करत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे खंबीर पाठबळ असल्याने राज्य वेगाने पुढे जात आहे. मंदिरांचे पुनर्निर्माण आणि धार्मिक स्थळांचा विकास ही आमची प्राथमिकता आहे. कुंभमेळ्यासाठी सध्या ३७७ एकर जमीन आरक्षित करण्यात आली आहे. मात्र, आखाड्यांनी अतिरिक्त जमिनीची मागणी केली असून, शासन त्याबाबत सकारात्मक आहे.

बैठकीला मुख्य सचिव राजेश अग्रवाल, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, नाशिक येथील वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, १३ आखाड्यांचे महंत व साधू उपस्थित होते. यावेळी आखाड्यांचे महंत यांनी विचार मांडले. बैठकीच्या सुरुवातीला त्र्यंबकेश्वर येथील मंदिराच्या दर्शन पथाचे ई-भूमिपूजन करण्यात आले.

# संत लोटांगणी । जाता लाजो नको मनी ॥ संत तुकाराम महाराज

## न लगे मुक्ती संपदा । संत संग देई सदा ॥

**हरिदासाचिया घरी ।**
**मज उपजवा जन्मांतरी ।।१।।**
**म्हणसी काही मागा ।**
**हेचि देगा पांडुरंगा ।।२।।**
**संता लोटांगणी ।**
**जाता लाजो नको मनी ।।३।।**
**तुका म्हणे अंगी ।**
**शक्ती देई नाचे रंगी ।।४।।**

युवावार्ता (सदाशिव मुळे)





जनतानगर

३८अखंड हरीनाम सप्ताह किर्तन महोत्सव सोहळा

जनतानगर, संगमनेर

संगमनेर शहराच्या जनतानगरमध्ये सुरू असलेल्या ह.भ.प. बाळकृष्ण महाराज कर्पे यांचे नेतृत्व व प्रेरणेने ३८ वा अखंड हरिनाम सप्ताह किर्तन महोत्सव सोहळ्यात कीर्तन रुपी सातवे पुष्प गुंफताना आळंदी येथील ह. भ. प. उमेश महाराज दशरथे यांनी जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचा देवाकडे जगाच्या कल्याणाचं दान मागणारा मागणी पर अभंग सेवेसाठी घेतला. या अभंगाचा मतितार्थ असा की, संत तुकाराम महाराज देवाकडे मागणी करतात. हे देवा मला प्रत्येक जन्मी हरिदासाच्याच घरी उपजवा, जन्मोजन्मातरी त्याच्याच घरी जन्म घेइन असे करा आणि दरवेळी मी तुझ्याकडे हेच मागेल कारण हेच दान तू मला त्यावेळेस द्यावी अशी माझी इच्छा आहे. ते मनाला बजावतात यापुढे संत दृष्टीस पडले तर त्यांना नतमस्तक होण्यास क्षणाचाही विलंब करू नकोस आणि लोक लाज तर किंचित देखील बाळगू नकोस उलट तात्काळ त्यांच्या पायी लोटांगण घाल. तुकोबा शेवटी म्हणतात हे देवा आता असं करण्यास तू माझ्या अंगी शक्ती दे, बळ दे आणि वैष्णवांच्या रंगात माझे मन रंगून जाईल अशीच त्यास नित्य उभारी दे. हेच माझे तुझ्याकडे आता मागणे आहे. या अभंगातून तुकोबा संत संग हेच जीवनाचे सर्वश्रेष्ठ धन मानतात. त्यासाठी ते जन्मोजन्मी हरिभक्ताच्या कुळात जन्म, संतांना भेटल्यावर अहंकारहित शरणागती आणि त्या भक्ती रंगात रंगण्याची शक्ती असे तिहेरी मागणे देवाकडे मागतात. अभंगावर चिंतन करताना ह. भ. प. उमेश महाराज दशरथे सांगतात की, अधिकार हा सेवेतून निर्माण होतो. अधिकार व ज्ञान यात फरक आहे. ज्याला ज्ञान नाही त्याने अधिकारी पुरुषाकडून ज्ञान घ्यावे. जेव्हा परमार्थात कळत नाही तिथे संतांचा सल्ला घ्यावा. देवाकडे काय मागायचे हे संतांकडून शिकावे. साधू संत कोणत्याही कुळात जन्माला आले व कोणत्याही परिस्थितीत जन्माला आले तरी त्यांनी संतपद मिळविलेले आहे संताकडे निरपेक्षता,स्वरूप शांती, निर्भयता व समदृष्टी असे गुण असतात. सेवा करत राहावी व काही मागावे असे हे परमार्थात नाही. हे संत चरित्रातून स्पष्ट होते. संत तुकाराम महाराजा सारखे वैराग्य दुर्मिळ आहे. पूर्वी प्रतिकूल परिस्थितीतही संतांनी धर्माची स्थापना केली, धर्माचे रक्षण केले व धर्म टिकून ठेवला. खरंतर संत काही मागतच नाही परंतु जगाच्या कल्याणासाठी व उद्धारासाठी, संत सहवास मिळावा यासाठी संत देवाकडे मागणी करतात. भवसागरातून सोडविण्यासाठी संत आहेत. संताविनाप्राप्ती नाही श्रवेद शास्त्र देती ग्वाही असे एकनाथ महाराज म्हणतात तसेच हरिप्राप्तीसी उपाय धरावे संतांचे पाय हे इथे सुचवतात त्यामुळे त्याने साधती साधने श्रतुटती भवाचे बंधने असा परिणामही सांगतात.यासाठी संत व सद्गुरु महत्त्वाचे आहेत. ज्याच्या कृतीत वृत्तीत परमार्थ आहे तेच खरे हरिदास आहेत परमार्थात संत संगती त्यांचा सहवास महत्त्वाचा आहे संतांच्या घरी राम नामाचे सात्विक भोजन मिळेल त्यासाठी संतांची सेवा करण्याची बुद्धी व शक्ती संत तुकाराम महाराज मा गतात. संतांच्या दारात विश्रांती आहे. संत संग हेच जीवनाचे सर्वश्रेष्ठ धन आहे. हरिदासाच्या घरी जन्म संत संग व संतांपुढे शरणागती आणि त्या भक्ती रंगात रंगण्याची शक्ती अशी तिहेरी मागणी या अभंगातून संत तुकाराम यांनी केलेली आहे.

# सत्यशोधक विचार मंच, संगमनेरतर्फे प्रांत अधिकाऱ्यांना निवेदन

## विकास लवांडे यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध; कारवाईची मागणी



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

सत्यशोधक विचार मंच, संगमनेर यांच्या वतीने ह.भ.प. विकास लवांडे यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ संगमनेर प्रांत अधिकारी अरुण उंडे यांना निवेदन देण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावे दिलेल्या या निवेदनात संबंधित आरोपींवर तात्काळ व कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, संग्राम भंडारे या व्यक्तीने विकास लवांडे यांना रस्त्यात गाठून शाई फेकणे, दमदाटी करणे, तसेच जीवे मारण्याची धमकी देणे, अशा प्रकारची गंभीर कृत्ये केली आहेत. वारकरी संप्रदाय हा समाजात समतेचा, शांततेचा आणि प्रेमाचा संदेश देणारा असून, जाती-धर्माच्या पलीकडे सर्वांना एकत्र आणण्याचे कार्य करतो. मात्र, काही स्वयंघोषित व्यक्ती समाजात तेढ निर्माण करून द्वेषाचे वातावरण निर्माण करत असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे.

तसेच संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत नामदेव, संत कबीर, संत जनाबाई यांच्या समतेच्या विचारांना विरोध करणाऱ्या प्रवृत्तींना खतपाणी घालण्याचे काम काही विकृत मंडळींकडून होत असल्याची खंतही व्यक्त करण्यात आली. समाजात धार्मिक व सामाजिक सलोखा बिघडविणाऱ्या व्यक्तींवर शासनाने कठोर भूमिका घ्यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

सत्यशोधक विचार मंच, संगमनेर यांनी या घटनेचा जाहीर निषेध नोंदवत, शाईफेक करणारे तसेच संबंधित घटनेत सहभागी असलेल्या आरोपींवर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर शिक्षा करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे. या निवेदनावर सत्यशोधक विचार मंचाच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या असून, संबंधित निवेदन संगमनेर येथील उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आले आहे.

# खत टंचाई संकटावर मात करण्यासाठी प्रयत्नांची आवश्यकता : डॉ. अजित नवले



अकोले (युवावार्ता प्रतिनिधी)-

युद्ध परिस्थिती व देशाच्या अर्थव्यवस्थेसमोरील संकट पाहता, येत्या खरीप हंगामामध्ये मोठी खत टंचाई निर्माण होण्याच्या शक्यता निर्माण झालेल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब यांनी सुद्धा देशवासीयांना टंचाईचा सल्ला देत असताना, शेतकऱ्यांनी खते जपून वापरावीत, असा निर्देश दिला आहे.

भारताला मोठ्या प्रमाणामध्ये आजही खतांसाठी लागणारा कच्चामाल व अनेक खते परदेशातून आयात करावी लागतात. आंतरराष्ट्रीय परिस्थिती व भारतीय परकीय चलनाची गंगाजळी पाहता, येत्या काळात खतांसाठी सरकार पुरेसा खर्च करू शकेल, अशी परिस्थिती राहिलेली नाही. त्यामुळेच शेतकऱ्यांना खतांबाबत काटकसरीचा सल्ला दिला जात आहे.

मात्र, यानुसार खरोखरच भीषण खत टंचाई निर्माण झाली, तर त्याचा अत्यंत वाईट परिणाम येणाऱ्या खरीपावर होईल. शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि अन्नधान्याचे उत्पादन यामुळे मोठ्या प्रमाणात कमी होईल. अन्नधान्याचे उत्पादन कमी झाल्याचा सरळ परिणाम देशाची अन्नसुरक्षा धोक्यात येण्यात व महागाई वाढण्यामध्ये होणार आहे. असे होऊ नये, यासाठी केंद्र व राज्य सरकारने आत्ताच तातडीने पावले टाकावीत. खत निर्मितीसाठी पुरेसा कच्चामाल योग्य दरामध्ये उपलब्ध होईल व पुरेशी खत निर्मिती होऊन शेतकऱ्यांना येत्या खरीप हंगामात खत टंचाईचा सामना करावा लागणार नाही, यासाठी कठोर प्रयत्न करावेत, असे आवाहन किसान सभा करत आहे.

# पोलिसांच्या सतर्कतेमुळे राजूर येथे बालविवाह रोखला

राजूर (युवावार्ता प्रतिनिधी)-

साखरपुडा झाला, हळदही लागली. आता विवाहाची तयारी सुरू होती. मात्र, याच दरम्यान पोलिसांना ११२ क्रमांकावरून फोन येताच, पोलिसांनी तातडीने आपली पावले मंगल कार्यालयाकडे वळवली आणि बालविवाह रोखला. हा प्रकार अकोले तालुक्यातील राजूर येथे बुधवारी घडला.

राजूर येथील एका लॉन्सवर विवाहाचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी वधू-वरांचा साखरपुडा झाला. त्यानंतर हळद समारंभही उरकला होता. दरम्यान, राजूर पोलीस ठाण्यात ११२ क्रमांकावरून एक फोन आला आणि राजूर येथील त्या लॉन्सवर एका अल्पवयीन मुलीचा विवाह समारंभ संपन्न होत असल्याची माहिती मिळाली.

संबंधित पोलीस कर्मचारी दत्तात्रय परते यांनी ११२ वरून मिळालेली माहिती सहायक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांना सांगितली. माहिती



मिळताच पवार, पोलीस कॉन्स्टेबल दत्तात्रय परते, संजय शिंदे आदी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांना पाहताच वऱ्हाडी मंडळी अवाक झाली.

यावेळी तिथे उलट-सुलट चर्चा तर झालीच, शिवाय धावपळही झाली. याबाबत पोलिसांनी ग्रामपंचायतीशी संपर्क साधून अधिक माहिती घेतली. ग्रामपंचायत कर्मचारी विवाह होत असलेल्या ठिकाणी आले. यानंतर पोलिसांनी अधिक माहिती घेतली असता, वधू अल्पवयीन असल्याचे समोर आले.

पोलिस आणि ग्रामपंचायत यांनी होणारा हा अल्पवयीन विवाह रोखला. पोलिसांनी यानंतर वधू, वर आणि त्यांच्या माता-पित्यांना घेऊन पोलीस ठाणे गाठले. पंचांसमक्ष त्यांचे जबाब घेण्यात आले. तसेच, १८ वर्षे वय पूर्ण होईपर्यंत लग्न करणार नाही, असे हमीपत्र घेऊन त्यांना सोडून देण्यात आले. मात्र, या घटनेची राजूरमध्ये दिवसभर चर्चा होती.

# थोरात कारखान्यातून १ कोटी ४० लाख लिटर इथेनॉल निर्मिती



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या आदर्श शिस्तीवर कारखान्यासह सर्व संस्थांची वाटचाल सुरू आहे. थोरात सह. साखर कारखान्यातून दारू न बनवता इंडस्ट्रियल अल्कोहोल निर्माण केले जात आहे . इथेनॉलचे महत्त्व जगाला कळाले असून सध्या युद्धामुळे जागतिक पातळीवर इंधनाचा मोठा तुटवडा निर्माण झाला आहे. वाढत्या इंधन समस्येला इथेनॉल हा मोठा पर्याय असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्राचे मा. कृषी व महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या इथेनॉल निर्मिती प्रकल्पातून चालू हंगामातून १ कोटी ४० लाख लिटर इथेनॉल निर्मिती झाल्याच्या प्रसंगी कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी नगराध्यक्ष सौ दुर्गाताई तांबे, व्हा चेअरमन पांडुरंग पा.घुले ,युवक काँग्रेसचे अध्यक्ष डॉक्टर जयश्रीताई थोरात, संचालक संपतराव गोडगे, सतीश वर्पे, विलास शिंदे, रामनाथ कुटे, विजय राहणे, गुलाबराव देशमुख ,अरुण वाकचौरे, अंकुश ताजणे ,मदन आंबरे, सौ लताताई गायकर, सौ सुंदराबाई दुबे हौशीराम सोनवणे, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, सेक्रेटरी किरण कानवडे ,कृष्णा दिघे, भारत देशमुख, अशोक मुटकुळे ,नवनाथ गडाख ,संजय पाटील आदींसह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

यावेळी बोलताना मा महसूल मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, राज्यभरात अनेक सहकारी कारखान्यांमधून अल्कोहोल मधून दारू ची निर्मिती केली जाते .मात्र सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या आदर्श शिस्तीत आणि विचारांवर या कारखान्याचे कामकाज सुरू असून थोरात सहकारी साखर कारखान्यात दारू न बनवता इंडस्ट्रियल अल्कोहोल निर्माण केले जाते. तरीही कारखान्याची वाटचाल चांगली असून कायम उच्चांकी भाव दिला आहे.

वीज निर्मिती आणि इथेनॉल प्रकल्प हे कारखान्याला मोठी मदत करत आहेत .युरोपियन देशांमधील युद्धामुळे जागतिक पातळीवरच इंधनाचा मोठा तुटवडा निर्माण झाला आहे. आता इथेनॉल चे महत्व जगाला कळाले आहे. आपल्या देशामध्ये ही पेट्रोल डिझेलसह इंधनाचा तुटवडा भासत आहे. याला इथेनॉल हा महत्त्वाचा पर्याय आहे. इथेनॉल निर्मिती करणाऱ्या सहकारी साखर कारखान्यांसाठी केंद्रसरकारने रास्त भाव ठरवून दिला पाहिजे अशी मागणी करताना सांघिक यशातून कारखान्याची यशस्वी वाटचाल सुरू असल्याचे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी केले .तर व्हा. चेअरमन पांडुरंग पाटील घुले यांनी आभार मानले यावेळी कार्यकर्ते ,पदाधिकारी व कारखान्याचे अधिकारी , कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय...

## 'नीट'च्या कागदावर उमटलेला अन्यायाचा ठसा

वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेतली जाणारी राष्ट्रीय पात्रता सह प्रवेश परीक्षा (नीट) संदर्भातील ताज्या घडामोडींनी देशातील शिक्षण व्यवस्थेवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाने मंगळवारी जाहीर केलेल्या निर्णयानुसार, ३ मे रोजी झालेली नीट परीक्षा पेपरफुटीच्या आरोपांमुळे रद्द करून पुन्हा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या परीक्षेत तब्बल १२० प्रश्न हे परीक्षेच्या सुमारे पंधरा दिवस आधीच काही अंदाजपत्रक स्वरूपात प्रसारित झालेल्या प्रश्नसंचिकेशी जुळणारे असल्याचे समोर आले, ज्यामुळे ही संपूर्ण परीक्षा संशयाच्या भोवऱ्यात सापडली. या प्रकारामुळे केवळ परीक्षेच्या पारदर्शकतेवरच नव्हे, तर संपूर्ण राष्ट्रीय मूल्यांकन यंत्रणेच्या विश्वासार्हतेवरही प्रश्न निर्माण झाले आहेत. देशभरातील जवळपास दहा लाख विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा द्यावी लागणार असल्याने हा निर्णय केवळ प्रशासकीय नाही तर थेट विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित अत्यंत गंभीर परिणाम करणारा ठरला आहे. गेली दोन वर्षे दिवस-रात्र मेहनत करून, अनेक प्रकारच्या अडचणींना सामोरे जाऊन या परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना अचानक पुन्हा नव्याने परीक्षा द्यावी लागणे हे मानसिकदृष्ट्या अत्यंत तणावपूर्ण आहे. ग्रामीण भागातून शहरांमध्ये शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांवर याचा अधिक आर्थिक आणि मानसिक भार पडणार आहे. वसतिगृह खर्च, कोचिंग क्लासेस, टेस्ट सिरीज, राहण्याचा खर्च आणि पुन्हा तयारीसाठी लागणारा वेळ यामुळे कुटुंबांवर मोठा आर्थिक ताण निर्माण होणार आहे. विशेषतः मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी हा निर्णय अधिकच वेदनादायक ठरत आहे. अनेक विद्यार्थ्यांनी आधीच परीक्षेची तयारी पूर्ण करून निकालाची प्रतीक्षा सुरू केली होती, परंतु अचानक परीक्षा रद्द झाल्याने त्यांच्या अपेक्षांवर पाणी फेरले गेले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये निराशा, राग आणि असंतोषाची भावना पसरत आहे. काहीही चुकीचे न करता केवळ यंत्रणात्मक त्रुटींमुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांना शिक्षा भोगावी लागत असल्याची भावना अधिक तीव्र होत आहे. ही केवळ परीक्षा रद्द करण्याची घटना नसून, विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यावर थेट परिणाम करणारी बाब आहे. वारंवार घडणाऱ्या पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांचा व्यवस्थेवरील विश्वास कमी होत चालला आहे. जर प्रत्येक मोठ्या परीक्षेत अशा प्रकारचे गैरप्रकार घडत राहिले, तर प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांनी कोणत्या आधारावर आणि कोणत्या विश्वासाने पुढील स्पर्धा परीक्षांची तयारी करावी, हा गंभीर प्रश्न निर्माण होतो. याआधीही २०२४ मध्ये नीट परीक्षेच्या संदर्भात पेपरफुटीचे प्रकरण समोर आले होते आणि त्यावेळीही निकालावर परिणाम झाला होता. त्या वेळी पेपर काही विद्यार्थ्यांपर्यंत लाखो रुपयांना पोहोचल्याचे आरोप झाले होते, ज्यामुळे संपूर्ण परीक्षा प्रक्रियेवर संशय निर्माण झाला होता. त्यानंतरही आवश्यक त्या कठोर आणि प्रभावी सुधारणा झाल्या नाहीत, हे यंदाच्या प्रकरणावरून स्पष्ट होते. राष्ट्रीय परीक्षा प्राधिकरणाची स्थापना ही पारदर्शक आणि विश्वासार्ह परीक्षा प्रणाली उभारण्यासाठी करण्यात आली होती, मात्र वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळे त्या उद्दिष्टांवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. परीक्षा प्रणालीतील सुरक्षेच्या उपाययोजना अधिक कडक, तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि पारदर्शक करण्याची गरज आहे. प्रश्नपत्रिकेची गुप्तता, डिजिटल सुरक्षा, मुद्रण प्रक्रिया, वितरण साखळी आणि परीक्षा केंद्रांवरील देखरेख यामध्ये अधिक काटेकोर नियंत्रण आवश्यक आहे. केवळ परीक्षा रद्द करणे किंवा पुन्हा घेणे हा उपाय नसून मूळ कारणांचा शोध घेऊन त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांचे भवितव्य हे कोणत्याही प्रकारच्या हलगर्जीपणा किंवा भ्रष्ट व्यवस्थेच्या खेळाचे साधन बनता कामा नये. देशातील वैद्यकीय शिक्षणाचा पाया असलेल्या या परीक्षेची विश्वासार्हता टिकवणे ही केवळ प्रशासनाची नव्हे तर संपूर्ण व्यवस्थेची जबाबदारी आहे. अन्यथा मेहनती, प्रामाणिक आणि स्वप्न पाहणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात जाण्याचा धोका अधिक वाढेल, ही वस्तुस्थिती दुर्लक्षित करता येणार नाही.

# भावपूर्ण श्रद्धांजली...! दिखाऊ अनिष्ट प्रथेला



आजही ग्रामीण भागात परंपरा, संस्कार आणि सामाजिक एकोप्याला मोठे महत्त्व आहे. सुख-दुःखाच्या प्रत्येक प्रसंगी गाव व आप्तेष्ट, नातेवाईक, मित्रपरिवार एकत्र येत असतो, हेच आपल्या संस्कृतीचे वैशिष्ट्य मानले जाते. मात्र, बदलत्या काळाच्या ओघात काही चांगल्या गोष्टींसोबत काही अनिष्ट रूढी आणि दिखाऊ प्रथाही समाजात फोफावत चालल्या आहेत. विशेषतः लग्न समारंभ, अंत्यविधी, दशक्रिया, पुण्यस्मरण अशा कार्यक्रमांमध्ये सुरू झालेली राजकीय, सामाजिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांची श्रद्धांजली, आशीर्वाद व शुभेच्छा भाषणांची स्पर्धा, आता हेच लोकांना अडचणीचे वाटू लागले आहे तथा गंभीर समस्येचे रूप धारण करू लागले आहे.

एखाद्या दुःखद प्रसंगी शेकडो ते हजारो लोक आपला अमूल्य वेळ काढून सांत्वनासाठी उपस्थित राहतात. मात्र, मुख्य विधी संपल्यानंतर तासनतास चालणाऱ्या भाषणांच्या मैफिलीमुळे उपस्थितांची मोठी गैरसोय होत असते. निवेदक आपल्या शैलीत प्रत्येक मान्यवराला व्यासपीठावर बोलावतो आणि मग एकामागून एक श्रद्धांजलीपर भाषणे सुरू होतात. अनेकदा पहिल्या व्यक्तीने जे सांगितले, तेच पुढचा वक्ताही पुन्हा सांगत असतो. शेवटी, फक्त माझ्या अमुक नेत्यांच्या वतीने व माझ्या परिवाराच्या वतीने श्रद्धांजली, एवढाच फरक उरतो.

यातील गंभीर बाब म्हणजे, काहींना मृत व्यक्तीची ओळख किंवा कौटुंबिक पार्श्वभूमीदेखील माहीत नसते, तरीही केवळ उपस्थिती दाखवण्यासाठी भाषण केले जाते. अनेकदा तर चुकीच्या व्यक्तीचा उल्लेख करून हयात व्यक्तीलाच श्रद्धांजली वाहण्याचे प्रकार घडतात. अशा वेळी त्या दुःखद प्रसंगाचे पावित्र्य कमी होते आणि उपस्थितांमध्ये संकोच निर्माण होतो. हे प्रकार आजही सर्रासपणे सुरू आहेत.

याहूनही मोठी समस्या म्हणजे राजकीय किंवा सामाजिक मान्यवरांचा नामोल्लेख न झाल्यास निर्माण होणारा रोष. निवेदकावर नाराजी, कुटुंबीयांवर भेदभाव केल्याचा आरोप, गावात चर्चा, हे प्रकार आता प्रत्येक गावात सामान्य झाले आहेत. दुःखाच्या प्रसंगीही प्रतिष्ठेची स्पर्धा सुरू असल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसून येते.

डिग्रस गावातील युवकांनी मात्र या चुकीच्या प्रथेला वेळीच ओळखले. अनेकदा या परिस्थितीला सामोरे गेल्यानंतर त्यांनी यावर उपाय शोधण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीला कोण पुढाकार घेणार? हा प्रश्न होता. कारण, काही कुटुंबांना वाटत असे की, आपल्यावरील प्रेमापोटी आलेल्या व्यक्तींनी दोन शब्द बोललेच पाहिजेत. पण या सगळ्या गोंधळात निवेदकच टीकेचा धनी ठरत होता.

शेवटी, गावातील युवकांनी एक सकारात्मक निर्णय घेतला. श्रद्धांजली भाषणांची प्रथा पूर्णपणे बंद करून, फक्त एकाच व्यक्तीने त्या कुटुंबाबद्दल, त्या व्यक्तीबद्दल प्रास्ताविक व भावना व्यक्त कराव्यात आणि सर्वांच्या वतीने सामुदायिक श्रद्धांजली अर्पण करावी, असा नवा पायंडा सुरू करण्यात आला. सुरुवातीला काही राजकीय आणि सामाजिक मान्यवरांनी अप्रत्यक्ष नाराजी व्यक्त केली, मात्र सर्वसामान्य उपस्थितांनी या निर्णयाचे मनापासून स्वागत केले. लोकांचा वेळ वाचू लागला, कार्यक्रम अधिक शिस्तबद्ध झाले आणि विधीचे पावित्र्यही टिकून राहिले.

समाजातील बदल हे नेहमी सुरुवातीला कठीण वाटतात. जसा चांगला रस्ता तयार करताना काही दिवस खोदकाम, खडीकरण, मुरुमीकरण याचा त्रास सहन करावा लागतो, नंतर सुंदर प्रवास सुरू होतो, तसाच सामाजिक सुधारणांचाही प्रवास असतो. परंतु, दीर्घकाळासाठी त्याचे परिणाम सकारात्मकच ठरतात, आणि हा उपक्रम सध्या तरी यशस्वी झाला आहे. अनेक बाहेरगावाहून येणाऱ्या मान्यवरांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. हीच काळाची गरज आहे, असे मत व्यक्त केले जात आहे.

आज गरज आहे ती गावोगावातील युवकांनी अशा अनिष्ट प्रथांविरोधात पुढे येण्याची. श्रद्धांजली हा दिखावा नसून भावनांचा विषय आहे. सामुदायिक प्रार्थना, पसायदान आणि शांततेत व्यक्त केलेल्या भावना, या कोणत्याही लांबलचक भाषणापेक्षा अधिक प्रभावी असतात. त्यामुळे वेळेची बचत होऊ लागली, कार्यक्रमांचे पावित्र्यही राखले जात आहे आणि मृत व्यक्तीला खरी आदरांजली वाहिली जात आहे, यात तिळमात्र शंका नाही. विशेष म्हणजे, काकस्पर्शही वेळेत होऊ लागले.

**पत्रकार – नवनाथ वावरे**


**CHANGE IN NAME**

"I, BARSHILE KANIFNATH DAGADU RESI. OF JAWALA, TAL. PARNER, DIST. A.NAGAR HEREBY DECLARE THROUGH THIS AFFIDAVIT THAT IN MY DAUGHTER TEJAL'S AADHAR CARD ONLY THE NAME 'BARSHILE TEJAL KANIFNATH' HAS BEEN MENTIONED. HER NAME AS PER MY SERVICE RECORD IS TEJAL KANIFNATH BARSHILE. THEREFORE, BOTH NAMES REFER TO THE SAME PERSON."

**CHANGE IN NAME**

"I, BARSHILE KANIFNATH DAGADU RESI. OF JAWALA, TAL. PARNER, DIST. A.NAGAR HEREBY DECLARE THROUGH THIS AFFIDAVIT THAT IN MY DAUGHTER PRANJAL'S AADHAR CARD ONLY THE NAME 'BARSHILE PRANJAL KANIFNATH' HAS BEEN MENTIONED. HER NAME AS PER MY SERVICE RECORD IS PRANJAL KANIFNATH BARSHILE. THEREFORE, BOTH NAMES REFER

**CHANGE IN NAME**

"I, BARSHILE PRAMILA KANIFNATH RESI. OF JAWALA, TAL. PARNER, DIST. A.NAGAR HEREBY DECLARE THROUGH THIS AFFIDAVIT THAT IN MY SELF PRAMILA'S AADHAR CARD ONLY THE NAME 'BARSHILE PRAMILA KANIFNATH' HAS BEEN MENTIONED. MY NAME AS PER MY HUSBAND'S SERVICE RECORD IS PRAMILA KANIFNATH BARSHILE. THEREFORE, BOTH NAMES REFER TO THE SAME PERSON."

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's

डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४

उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी

महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत **डायलेसिस सुविधा उपलब्ध**

या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

**जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी**

**त्वरित पाहिजेत**
पेट्रोल पंप वर २ कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक उमेदवारांनी संपर्क करावा
पत्ता - चैतन्य पेट्रोलियम, संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी
8888808397

**पाहिजेत**
पुरुष रिसेप्शनिस्ट
अनुभवास प्राधान्य, बँकिंग व्यवहाराचे ज्ञान, संगणकाचे ज्ञान व स्वतःची दुचाकी व लायसन्स आवश्यक
संपर्क – नविन नगर रोड, संगमनेर
8378956909
8459199913

**पाहिजेत**
अकाऊंटस् व ऑडिटच्या कामासाठी हुशार व होतकरू मुले पाहिजेत
जितेंद्र लाहोटी (चार्टर्ड अकाऊंटंट)
मेनरोड, काळभैरवनाथ मंदिरा शेजारी, संगमनेर
9822523424

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**पाहिजेत**
पसायदान चिल्ड्रन क्लिनिक अ‍ॅण्ड नर्सिंग होम
ताजणे मळा, नविन नगर रोड, संगमनेर
डॉक्टर – BAMS / BHMS (सकाळ–१, रात्री –१)
नर्स – ANM / GNM (सकाळी –१, दुपारी–१, रात्री –२)
लॅब टेक्निशिअन (सकाळी –१, रात्री –१)
९९६०६१०६२३

**ड्रायव्हर पाहिजे**
ऑटोमॅटिक गाडीसाठी ०१ जागा
मॅन्युअल गेअर गाडीसाठी ०१ जागा
निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
8668269897

**गाळे भाडेतत्वावर देणे आहे**
शोरुम, ऑफीस, बँक किंवा कमर्शिअल वापरासाठी दोन गाळे भाडे तत्वावर देणे आहे
ग्राऊंड फ्लोअर – १७०० स्क्वे. फुट
फर्स्ट फ्लोअर – १७०० स्क्वे. फुट
पत्ता – नाशिक–पुणे हायवे, डेंटल कॉलेज समोर, घुलेवाडी, ता. संगमनेर
संपर्क - 7755965616, 9422737484

**त्वरित पाहिजेत**
ड्रायव्हर तसेच ऑफिस काम व साईट व्हिजिटसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
9421911671

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक ९३२५०२८६८६

दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर, ०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या, व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

**युवावार्ता** परिवर्तनाचा पुरस्कर्ता



**पाहिजेत**
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाटचाल तीन दशकांची

II Shram Devo Bhava II
Seva Sanskar Sanstha's

**Shramshakti Vidya Niketan School & Shramshakti Junior College,**

At.po. Maldad, Tal. Sangamner, Dist.A.Nagar (MS), Pin-422608
Contact No. 9689863599, 9890408093, 8805100906
Email - shramshaktividyaniketan26@gmail.com

**WALK-IN-INTERVIEW**

Eligible candidates with fluency in English and having teaching experience may walk in for the interview scheduled on 21th and 22th May 2026 from 09.00 am to 12.00 pm alongwith Bio-data/Resume, KYC and all necessary documents with preparation for demo lecture.

| Sr. No. | Position | No. Of Posts | Qalification |
|---|---|---|---|
| 1 | Pre- Primary | 5 | Basic- Training Cartificate (B.T.C)/ Teacher Training Certificate (T.T.C) Pre-primary Teacher Training Montessori Trained |
| 2 | Primary & Secondary | 2 (Each Subject) | Basic- Training Cartificate (B.T.C)/ Teacher Training Certificate (T.T.C) Pre-primary Teacher Training Montessori Trained |
| | **Junior College** | | |
| 3 | Maths, Physics Biology, Chemistry | 2 (Each Subject) | M.Sc., B.Ed. in relevant subject |
| 4 | Marathi, Hindi, English, Geography | 2 (Each Subject) | M.A., B.Ed. in relevant subject |
| 5 | Computer Teacher | 1 | B.C.S./M.C.S./M.C.A B.C.S.M.C.S. |
| 6 | Music Teacher | 1 | Sangit Visharad |
| 7 | Art Teacher | 1 | ATD Drawing |
| 8 | Clerk | 2 | B.Com/M.Com. With MS-CIT, Typing, Tally |
| 9 | Female Care Taker | 2 | S.S.C. OR H.S.C. |
| 10 | Peon | 1 | S.S.C. |
| 11 | Bus Driver | 4 | Driving License with experience |

**Venue: Shramshakti Vidya Niketan Campus (Conference Hall) Maldad**

***Mandatory-Fill the registration Google form before 19th May 2026**

Sd/-
Secretary

Happy Birthday



**मा. श्री. विजयराव डाके**
जेष्ठ समाजसेवक



**सचिन पलोड**
सामाजिक कार्यकर्ते



**विजय रोहोकले**
संचालक – विजया ॲग्रो इंडस्ट्रीज

शुभेच्छुक - दैनिक युवावार्ता

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME
LATIF JANMAHAMED SHAIKH

TO NEW NAME AS
LATIF JANMOHAMMAD SHAIKH

ADD – AT POST JORVE ROAD, NOOR MASJID JAWAL, EKTA NAGAR, SANGAMNER, TAL - SANGAMNER, DIST - AHMEDNAGAR

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME
AFIADA MOHD SHAFI SHAIKH

TO NEW NAME AS
AFIDA ZAKIR SHAIKH

ADD – DILLI NAKA , GALANDE MALA , BHARAT NAGAR ,, SANGAMNER, TAL - SANGAMNER, DIST - AHMEDNAGAR






# इंधन बचत आणि साधेपणाचा आदर्श : पालकमंत्री विखे यांनी शासकीय ताफा केला मर्यादित

अहिल्यानगर (युवावार्ता प्रतिनिधी)- देशभरात इंधन बचत, पर्यावरण संरक्षण आणि अनावश्यक शासकीय खर्च कमी करण्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या संदेशाची व्यापक चर्चा सुरू असतानाच, अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रत्यक्ष कृतीतून त्याला प्रतिसाद दिला आहे. शासकीय ताफ्यातील अनावश्यक वाहनांची संख्या कमी करत, त्यांनी आता आपल्या ताफ्यात केवळ दोनच वाहने ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.



पालकमंत्री विखे पाटील यांच्या या निर्णयामुळे राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली असून, सामान्य नागरिकांकडूनही या निर्णयाचे स्वागत केले जात आहे. वाढत्या इंधन दरांच्या पार्श्वभूमीवर लोकप्रतिनिधींनी स्वत:पासून काटकसरीची सुरुवात करावी, असा सकारात्मक संदेश या निर्णयातून दिला जात असल्याचे बोलले जात आहे.

सध्या देशभरात इंधन वापर कमी करणे, पर्यावरण संवर्धन आणि कार्बन उत्सर्जनावर नियंत्रण ठेवण्यावर भर दिला जात आहे. अशा परिस्थितीत मोठे ताफे, अतिरिक्त वाहनांचा वापर आणि त्यातून वाढणारा शासकीय खर्च, यावर अनेकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते. याच पार्श्वभूमीवर पालकमंत्री विखे पाटील यांनी घेतलेला हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

राजकीय पदाधिकाऱ्यांचे मोठे ताफे, त्यासाठी लागणारा इंधन खर्च आणि प्रशासनावर येणारा अतिरिक्त भार, याबाबत सामान्य नागरिकांमध्ये अनेकदा नाराजी व्यक्त होत असते. मात्र, विखे पाटील यांनी स्वतःहून पुढाकार घेत ताफ्यात कपात केल्याने साधेपणा आणि जबाबदारीचे उदाहरण समोर आले आहे. पर्यावरणपूरक जीवनशैली, इंधन बचत आणि सार्वजनिक पैशांचा योग्य वापर, या तिन्ही गोष्टींचा समतोल साधण्याचा प्रयत्न या निर्णयातून दिसून येत आहे.

लोकप्रतिनिधींनी केवळ संदेश देऊन चालत नाही, तर स्वतः कृतीतून आदर्श निर्माण करणेही गरजेचे आहे, अशी प्रतिक्रिया अनेक नागरिकांकडून व्यक्त होत आहे. पालकमंत्री विखे पाटील यांच्या या निर्णयामुळे राज्यातील इतर लोकप्रतिनिधी आणि शासकीय यंत्रणांनीही अशा प्रकारे खर्चात बचत करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा आता व्यक्त केली जात आहे. इंधन बचतीसह पर्यावरण रक्षणाचा संदेश देणारा हा निर्णय सध्या जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरत आहे.

# नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा बोधचिन्हाचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मान्यवरांच्या हस्ते अनावरण

मुंबई (जिल्हा माहिती कार्यालय)- नाशिक त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा आयोजित होत आहे. या कुंभमेळ्याच्या बोधचिन्हाचे अनावरण सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



कुंभमेळ्याच्या लोगोसाठी कुंभमेळा प्राधिकरणाच्यावतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सुमारे तीन हजारांहून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला. या स्पर्धकांमधून तीन उत्कृष्ट स्पर्धकांचा यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रथम क्रमांक पटकावलेल्या पुणे येथील सुमित काटे यांना तीन लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक पटकावलेल्या नोएडा येथील मयांक नायक यांना दोन लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह, आणि तृतीय क्रमांक पटकावलेल्या पंढरपूर येथील पीयुष पिंपळनेरकर यांना एक लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रसून जोशी, अश्विनी देशपांडे, मंदार राणे, वृषाली केकणे देशमुख, बारिश दाते, विनय नारंग, डॉ. प्राजक्ता बास्ते, प्रफुल्ल सावंत, डॉ. दिनेश वैद्य, अँथनी लोपेझ आणि डॉ. किरण शिंदे यांसारख्या दिग्गज डिझाइन तज्ज्ञांच्या समितीने या प्रवेशिकांचे परीक्षण केले. सर्जनशीलता, नाविन्य, ब्रँड सुसंगतता आणि सादरीकरण या निकषांवर आधारित ही निवड करण्यात आली. या समितीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी प्रास्ताविकाद्वारे कुंभमेळा आयोजन आणि लोगो स्पर्धेबाबत माहिती दिली.

यावेळी कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, उद्योग मंत्री उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, कुंभमेळा प्राधिकरण आयुक्त शेखर सिंह यांच्यासह विविध आखाड्यांचे साधू संत उपस्थित होते. मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी यावेळी उपस्थित साधू संतांचे स्वागत केले.

नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा बोधचिन्हाविषयी

नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण, मायगव्ह आणि असोसिएशन ऑफ डिझाइनर्स ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या देशव्यापी डिझाइन स्पर्धेतून या बोधचिन्हाची निवड करण्यात आली. वीस नोव्हेंबर ते वीस डिसेंबर दोन हजार पंचवीस या कालावधीत मायगव्ह प्लॅटफॉर्मवर पार पडलेल्या या स्पर्धेत सत्तर आंतरराष्ट्रीय स्पर्धकांसह एकूण तीन हजार साठ सात प्रवेशिका प्राप्त झाल्या होत्या. सहभागाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य आघाडीवर राहिले, त्याखालोखाल दिल्ली आणि तामिळनाडूचा क्रमांक लागला. अठरा ते चोवीस वयोगटातील तरुणांनी या स्पर्धेत सर्वाधिक सक्रिय सहभाग नोंदवला.

या बोधचिन्हामध्ये नाशिक आणि त्र्यंबकेश्वरचा पवित्र भूगोल आणि धार्मिक परंपरा दर्शवण्यात आली आहे. भगवान शंकराचे त्रिशूळ हे आध्यात्मिक उर्जेचे प्रतीक म्हणून दाखवण्यात आले आहे. त्र्यंबकेश्वर मंदिराची प्रतिकृती प्रादेशिक वारसा अधोरेखित करते. काळाराम मंदिराची कमान आणि गोदावरी नदीला शिवलिंगाच्या रूपात दर्शवून कुंभमेळ्यातील पवित्र स्नान परंपरेचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले आहे.

# उमा गौरी फाउंडेशन व धन्वंतरी हॉस्पिटलतर्फे परिचारिका दिन साजरा

संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- उमा गौरी वुमन्स ग्लोबल फाउंडेशन व धन्वंतरी मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन साजरा करण्यात आला. आधुनिक परिचर्या सेवेच्या जनक फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांच्या जयंतीनिमित्त १२ मे हा दिवस संपूर्ण जगभर आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन म्हणून साजरा केला जातो. मानवतेची सेवा, करुणा, त्याग आणि समर्पण यांचे जिवंत उदाहरण म्हणजे परिचारिका.




आरोग्य व्यवस्थेमध्ये डॉक्टर जितके महत्त्वाचे आहेत, तितकीच महत्त्वाची भूमिका परिचारिका बजावतात. रुग्णालयातील प्रत्येक रुग्णासाठी परिचारिका ही आशेचा किरण असते. रुग्णांची काळजी घेणे, वेळेवर औषधे देणे, मानसिक आधार देणे, आपत्कालीन परिस्थितीत तत्पर सेवा देणे आणि रुग्णांच्या प्रत्येक गरजेची काळजी घेणे, हे कार्य त्या अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडतात.

परिचारिका व्यवसाय हा केवळ नोकरी नसून, तो सेवाभावाचा आणि मानवतेचा सर्वोच्च आदर्श आहे. रुग्ण वेदनेत असताना त्याला धीर देणारा हात म्हणजे परिचारिका. कधी आईप्रमाणे माया, तर कधी कुटुंबीयांप्रमाणे आधार देत त्या रुग्णांना नवजीवन देण्याचे कार्य करतात. कोविड-१९ महामारीच्या काळात संपूर्ण जगाने परिचारिकांचे कार्य जवळून पाहिले. अनेक परिचारिकांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता दिवस-रात्र रुग्णसेवा केली. त्या काळात त्यांनी कुटुंबापासून दूर राहून समाजासाठी कार्य केले. त्यामुळे परिचारिका या खऱ्या अर्थाने फ्रंटलाइन वॉरियर्स ठरल्या. त्यांच्या त्यागामुळे अनेक रुग्णांना नवजीवन मिळाले.

आज वैद्यकीय क्षेत्र झपाट्याने आधुनिक होत आहे. नवीन तंत्रज्ञान, अत्याधुनिक उपचारपद्धती आणि बदलत्या आरोग्य गरजांनुसार परिचारिकांनाही सतत अद्ययावत राहावे लागते. त्यामुळे परिचारिकांचे शिक्षण, प्रशिक्षण आणि मानसिक सक्षमीकरण यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. समाजामध्ये अनेकदा डॉक्टरांचे कार्य दिसून येते; परंतु, रुग्णालयात २४ तास रुग्णांच्या सेवेसाठी तत्पर असणाऱ्या परिचारिकांचे योगदान तितकेच मोठे आहे. त्यांच्या सेवेमुळेच रुग्णांच्या मनात विश्वास निर्माण होतो आणि उपचार प्रक्रियेला सकारात्मक दिशा मिळते.

# डोंगरची काळी मैना पीकायला सुरुवात

## विक्रीसाठी बाजारपेठेत दाखल

राजूर (युवावार्ता प्रतिनिधी)- अकोले तालुक्यातील कळसुबाई व हरिश्चंद्रगड अभयारण्यात 'डोंगरची काळी मैना' पिकायला सुरुवात झाली असून, फक्त उन्हाळ्यातच चाखावयास मिळणारा हा रानमेवा भंडारदर्याच्या अभयारण्यात झाडांना लगडलेला दिसून येत आहे. हा रानमेवा आदिवासी बांधवांच्या उपजीविकेचे साधन ठरत असून, बाहेर गावातील व्यापारी भंडारदर्याच्या अभयारण्यात येऊन अतिशय कवडीमोल भावाने करवंदे खरेदी करत आहेत. कळसूबाईची पर्वतरांग, कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्य, डोंगरची 'काळी मैना' उर्फ 'करवंदे' पूर्ण क्षमतेनं पिकण्यास सुरुवात झाली असून, बालगोपाळांची पावले आपसुकच जंगलाच्या दिशेने वळू लागली आहेत.



छाया– विलास तुपे, राजूर

अकोले तालुक्यातील भंडारदर्याच्या कळसूबाई हरिश्चंद्रगड अभयारण्यात असणाऱ्या जंगलामध्ये करवंदाच्या काळ्याभोर जाळ्या लगडताना दिसून येत आहेत. या जंगलच्या रानमेव्याची चवच न्यारी असते. आदिवासी बांधव पहाटे लवकर उठून करवंदे तोडण्यासाठी रानात पायपीट करतात आणि आजूबाजूच्या खेड्यापाड्यात आणि शहरी भागात विक्रीसाठी नेतात. 'डोंगरांची काळी मैना' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या करवंदांचा गोडवा वाढत्या तापमानात मनाला गारवा देणारा आहे. डोंगररांगेत मोठ्या प्रमाणात करवंदाच्या जाळ्या पाहायला मिळतात. थंडगार असलेली करवंद खायला मस्त असून, ती खाल्ल्यानंतर मनाला गारवा मिळतो.

करवंदं पिकायला लागली की, भंडारदर्याच्या बाजारपेठेत करवंदं विकणाऱ्या मुलांच्या टोळ्या दिसून यायच्या. या करवंदाच्या विक्रीतून उपलब्ध होणाऱ्या पैशावर शाळकरी मुले आपल्या वह्या-पुस्तकांची गरज भागवत होती. परंतु, गत तीन ते चार वर्षांपासून या मुलांना मोबाईलचं वेड मोठ्या प्रमाणात लागल्यानं या मुलांच्या टोळ्याच गायब झाल्या आहेत. त्यामुळं शंभरात एखादा शाळकरी मुलगा कुठेतरी रस्त्याच्या कडेला 'करवंदे घ्या करवंदे' अशी साद घालताना नजरेस पडतो.

चांगल्या आरोग्यासाठी अतिशय उपयुक्त करवंद हे बेरी वर्गीय फळ असून, त्याचा आरोग्यासाठी चांगला उपयोग होतो. यामधील अनेक घटक रोगप्रतिकारशक्तीचं काम करतात. करवंद हे नाशवंत फळ असल्यानं जास्त काळ टिकत नाही. मात्र, कच्च्या करवंदाचं लोणचं आणि पिकलेल्या करवंदांचा मुरब्बा केला, तर जास्त काळ टिकतो. करवंदांच्या झाडांना प्रचंड प्रमाणात काटे असतात. अशामध्ये कष्टपूर्वक काढलेल्या करवंदांना कमी भाव बाजारात मिळतो. शहरात आणि ग्रामीण भागात उन्हाळी रानमेवा व्यतिरिक्त करवंदाची चव काही औरच असते. परंतु, आता आदिवासी भागात झाडांची कत्तल मोठ्या प्रमाणावर होऊ लागल्यानं या रानमेवाच्या झाडांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असल्यानं, याही झाडांचं संवर्धन होणं गरजेचं आहे.

# रुपया विक्रमी घसरणीच्या छायेत

## अर्थव्यवस्थेवर महागाईचे सावट

रुपया डॉलरच्या तुलनेत २५ पैशांनी घसरून ९५.७५ च्या विक्रमी नीचांकी पातळीवर पोहोचला आहे. यापूर्वी मंगळवारीही रुपया ९५.५० च्या सर्वकालीन नीचांकी पातळीवर पोहोचला होता. गेल्या काही दिवसांपासून रुपयामध्ये सातत्याने घसरण सुरू आहे. २०२६ च्या सुरुवातीपासूनच रुपया दबावाखाली असून, गेल्या वर्षी डिसेंबर २०२५ मध्ये रुपया प्रथमच ९० च्या पातळीपुढे गेला होता. यामुळे महागाई वाढण्याचा धोका अधिक गडद झाला आहे.



रुपयाच्या या घसरणीमागे आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक कारणे आहेत. अमेरिका-इराण संघर्षामुळे कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये वाढ झाली आहे. २८ फेब्रुवारी रोजी संघर्ष सुरू झाल्यापासून ब्रेंट क्रूडच्या किमती सुमारे ५० टक्क्यांपर्यंत वाढल्या असून, त्याचा थेट परिणाम रुपयाच्या मूल्यावर झाला आहे. भारत आपल्या गरजेच्या सुमारे ८० टक्के तेल आयात करतो, त्यामुळे तेल महाग झाल्यावर डॉलरची मागणी वाढते आणि रुपया कमजोर होतो.

आंतरराष्ट्रीय राजकीय तणावही रुपयाच्या घसरणीस कारणीभूत ठरत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबतच्या संघर्षविरामाबाबत कठोर भूमिका घेतल्याने आखाती देशांमध्ये तणाव वाढला आहे. अशा परिस्थितीत गुंतवणूकदार उदयोन्मुख बाजारपेठांमधून, विशेषतः भारतासारख्या देशांतून, पैसे काढून सुरक्षित गुंतवणुकीकडे वळत आहेत. यामुळे परकीय भांडवलाचा प्रवाह कमी होऊन रुपया दबावाखाली आला आहे.

जागतिक बाजारात डॉलरला सुरक्षित गुंतवणूक म्हणून पाहिले जात असल्याने डॉलरची मागणी वाढली आहे. याच पार्श्वभूमीवर परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदार भारतीय शेअर बाजारातून गुंतवणूक काढून डॉलरमध्ये परत नेत आहेत, ज्यामुळे रुपयावर आणखी ताण येत आहे. त्याचबरोबर तेलाच्या किमती वाढल्याने देशाचे आयात बिल मोठ्या प्रमाणात वाढले असून, चालू खात्यातील तूट वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींचा परिणाम केवळ चलनावरच नव्हे तर सर्वसामान्य जनजीवनावरही दिसून येत आहे. एलपीजी, प्लास्टिक आणि पेट्रोकेमिकल उत्पादनांचे दर वाढण्याची शक्यता आहे. पेट्रोल-डिझेलसह दैनंदिन वस्तू महाग होण्याचा धोका असून, किरकोळ महागाई वाढू शकते. तसेच परदेशात शिक्षण, प्रवास आणि खरेदी यासाठी अधिक खर्च करावा लागणार आहे. इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंच्या किमतीही वाढण्याची शक्यता आहे कारण त्यांचे व्यवहार डॉलरमध्ये होतात.

ओपेक देशांचे तेल उत्पादनही गेल्या दोन दशकांतील नीचांकी पातळीवर असल्याचे रॉयटर्सच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. स्ट्रेट ऑफ होर्मुजमधील तणावामुळे तेल पुरवठ्यात अडथळे निर्माण होण्याची शक्यता असून, बाजार स्थिर होण्यासाठी २०२७ पर्यंत वेळ लागू शकतो, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे. जेपी मॉर्गनच्या अहवालानुसार, तेलाच्या किमती पुढील काळात १०० डॉलर प्रति बॅरलच्या आसपास राहण्याची शक्यता आहे.

दरम्यान, रुपयाच्या घसरणीच्या पार्श्वभूमीवर सरकारकडून काही उपाययोजना करण्यात येत आहेत. मौल्यवान धातूंच्या आयातीवरील शुल्क वाढवून डॉलर बाहेर जाण्याचा वेग कमी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. पंतप्रधानांनीही नागरिकांना अनावश्यक खर्च टाळण्याचे आणि आर्थिक शिस्त पाळण्याचे आवाहन केले आहे. मात्र, तज्ज्ञांच्या मते आगामी काळात रुपयावरचा दबाव कायम राहू शकतो.

चलनाचे मूल्य प्रामुख्याने परकीय चलन साठ्यावर अवलंबून असते. देशाकडे पुरेसा डॉलर साठा असल्यास रुपया स्थिर राहतो, तर डॉलरची कमतरता निर्माण झाल्यास रुपया कमजोर होतो. सध्या जागतिक परिस्थिती आणि आर्थिक घटकांमुळे रुपया सतत दबावाखाली आहे आणि त्याचा परिणाम थेट महागाईवर होताना दिसत आहे.

# संगमनेर तालुक्यावर अवकाळी...

पान नं. ०१ वरुन-

रणखांब परिसरातही वादळी पावसाने मोठे नुकसान केले. बारवेवस्ती परिसरात सुधाकर पांडुरंग मन्सूक आणि सुभाष लहानु गुळवे हे शेतकरी आपल्या शेळ्या चारत असताना अचानक विजांचा कडकडाट सुरू झाला. त्यावेळी वीज पडून सुधाकर मन्सूक यांच्या चार तर सुभाष गुळवे यांच्या एका अशा एकूण पाच शेळ्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच सरपंच बाबाजी गुळवे यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करण्याची मागणी केली. महसूल विभागालाही याबाबत माहिती देण्यात आली आहे.

वादळी वाऱ्याचा मोठा फटका पानोडी, हजारवाडी आणि परिसरातील शेतकऱ्यांना बसला. हजारवाडी येथील शिवलाल कृष्ण कोळेकर यांच्या कोंबड्यांच्या शेडवरील सुमारे ६५ ते ७० किलो वजनाची लोखंडी जाळी तुटून थेट विहिरीत कोसळली. या दुर्घटनेत अंदाजे १५ ते २० कोंबड्या आणि ६५ ते ७० पिल्ले विहिरीत पडल्याची माहिती मिळाली आहे. काही कोंबड्यांचा मृत्यू झाला असून काहींना ग्रामस्थांनी प्रयत्नपूर्वक वाचविले. कुक्कुटपालन हा त्यांच्या उत्पन्नाचा प्रमुख आधार असल्याने कोळेकर कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

पिंपरणे, शिबलापूर, आश्वी, शेडगाव, मालुंजे, कनोली आणि पानोडी परिसरातही वादळी पावसाने जोरदार हजेरी लावत नागरिकांची धावपळ उडवली. पिंपरणे ते शिबलापूर रस्त्यालगतची अनेक मोठी झाडे उन्मळून थेट रस्त्यावर कोसळल्याने काही काळ वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. सायंकाळच्या वेळेत कामावरून घरी परतणारे नागरिक व वाहनचालक रस्त्यात अडकून पडले.

चंद्रभान वामन मुंतोडे यांच्या दुकानावर मोठे लिंबाचे झाड कोसळल्याने दुकानाचे मोठे नुकसान झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. अन्वर शेख यांनी कांदा साठवण्यासाठी उभारलेली कांदा शेड वाऱ्याच्या तडाख्यात पूर्णपणे कोसळली असून त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. अनेक शेतकर्यांच्या शेतीमालाचेही नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

या अवकाळी वादळामुळे तालुक्यातील अनेक भागांमध्ये विजेचे खांब कोसळले असून वीजपुरवठा खंडित झाला होता. शेतांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याने परिसरात जलमय परिस्थिती निर्माण झाली. काही ठिकाणी शेतकर्यांची घरे पूर्णपणे कोसळली असून जनावरांचे गोठेही उद्ध्वस्त झाले आहेत. प्राथमिक अंदाजानुसार जवळपास १०० ते २०० झाडे या वादळात उन्मळून पडल्याचे सांगितले जात आहे.

अचानक आलेल्या या नैसर्गिक संकटामुळे शेतकरी, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून प्रशासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्तांना त्वरित मदत व नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आह

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

दैनिक **युवावार्ता**
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०









# भंडारदरा धरणातून आवर्तन तुर्तास थांबवले

### साठ्याचा आढावा घेऊन पाणी सोडण्याचा निर्णय

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - भंडारदरा धरणातून तीन दिवसांपूर्वी शेतीसाठी आवर्तन सोडण्यात आले होते. हे आवर्तन आज बंद करण्यात आले. आठ दिवसांनंतर धरणातील पाण्याचा आढावा घेऊन आवर्तन सोडण्यात येणार असल्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

भंडारदरा परिसरात उन्हाची तीव्रता अधिक असल्यामुळे धरणातून बाष्पीभवनाचे प्रमाण वाढत असल्यामुळे धरणसाठा कमी होत आहे. धरणामध्ये अवघे ३५ टक्के पाणी शिल्लक राहिले असून, पावसाळा सुरू होण्यास आणखी एक महिन्याचा कालावधी असतानाच भंडारदऱ्याचा पाणीसाठा आणखी कमी होण्याची शक्यता धरण शाखेकडून वर्तवण्यात आली आहे. सोमवारी संध्याकाळी भंडारदरा धरणाचा पाणीसाठा ४ हजार २२५ दशलक्ष घनफूट शिल्लक राहिला आहे. मागील वर्षी याच तारखेला भंडारदरा धरणामध्ये ४ हजार ३६४ दशलक्ष घनफूट पाणी शिल्लक होते. सोमवारपासून धरणातून शेतीसाठी पाणी सोडले होते. आज हे आवर्तन बंद करण्यात आले. यावर्षी कमी पाऊस पडण्याचे संकेत हवामान खात्याकडून देण्यात आले आहेत. सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू आहेत. त्यामध्येच शाळेला लागलेल्या सुट्यांमुळे भंडारदऱ्याला पर्यटक भेट देत आहेत. धरणाच्या अम्ब्रेला धबधब्यामधून पाणी सोडण्यात यावे, अशी मागणी व्यापारी व पर्यटक सुद्धा करत आहेत. मागील वर्षी सुद्धा भंडारदऱ्याच्या अम्ब्रेला धबधब्यामधून पाणी सोडण्यात आल्यामुळे भंडारदऱ्याला पर्यटकांची गर्दी वाढली होती.

# राजुरच्या तरुणाची 'एटीएस'कडून चौकशी

अकोले युवावार्ता (प्रतिनिधी)

पाकिस्तानी गँगस्टर शहजाद भट्टी याच्याशी सोशल मीडियाच्या माध्यमातून संपर्कात असल्याच्या संशयावरून अकोले तालुक्यातील राजुर येथील एका तरूणाची महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) बुधवारी (१३ मे) चौकशी केली. स्थानिक पोलिसांच्या मदतीने संबंधित तरूणाला ताब्यात घेऊन दिवसभर कसून चौकशी करण्यात आली. मात्र प्राथमिक तपासात ठोस आक्षेपार्ह माहिती न मिळाल्याने त्याला सोडून

देण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. दरम्यान, एटीएसने बुधवारी राज्यभर मोठ्या प्रमाणावर धाडसत्र राबवित विविध शहरांमध्ये एकाचवेळी कारवाया केल्या. सोशल मीडियाच्या माध्यमातून भारतीय तरूणांना आपल्या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न करणाऱ्या पाकिस्तानस्थित गुन्हेगारी नेटवर्कविरोधात ही मोहीम सुरू करण्यात आल्याचे समजते.

राजुर येथील संबंधित तरूणाचे काही सोशल मीडिया व्यवहार संशयास्पद असल्याची माहिती तपास यंत्रणांना मिळाली होती. त्यानुसार एटीएसचे पथक सकाळी राजुर येथे दाखल झाले. स्थानिक पोलिसांच्या सहकार्याने संबंधित तरूणाला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले. त्याच्या मोबाईल फोनसह सोशल मीडिया अकाउंट्स, डिजिटल व्यवहार आणि संपर्काची तपासणी करण्यात आली. गँगस्टर शहजाद भट्टी आणि त्याच्या तपास यंत्रणांकडून विशेषतः पाकिस्तानी कथित 'डोगर गँग'शी संबंधित सोशल मीडिया संपर्काची माहिती गोळा केली जात आहे. या माध्यमातून महाराष्ट्रातील काही तरूणांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. बुधवारी मुंबई, ठाणे, पुणे, नालासोपारा, मिरारोड, नागपूर, अकोला, नांदेड, नाशिक, जळगाव यांसह विविध शहरांमध्ये एटीएसने तपास मोहीम राबविली. काही संशयितांच्या सोशल मीडिया अकाउंट्सची पडताळणी करण्यात येत असून डिजिटल पुरावे तपासले जात आहेत.







# गर्भलिंगनिदान रॅकेटमधील डॉ. शेखला अटक

### आरोपीने दिली कबुली

युवावार्ता (प्रतिनिधी)

श्रीरामपूर -: लोणी पोलिस ठाण्यांतर्गत दाखल गर्भलिंग चाचणी व बेकायदेशीर गर्भपात प्रकरणाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे. गर्भपातासाठी लागणाऱ्या गोळ्या पुरवणाऱ्या श्रीरामपूर येथील एका डॉक्टरला बुधवारी पोलिसांनी अटक केली. डॉ. राज अजीज शेख असे त्याचे नाव आहे. बुधवारी पहाटे श्रीरामपूर अपर पोलिस अधीक्षक कार्यालयातील पथकाने त्याला ताब्यात घेतले.

लोणी पोलिस स्टेशन येथे दाखल असणाऱ्या गर्भलिंग चाचणी व बेकायदेशीरपणे गर्भपात प्रकरणाबाबतच्या गुन्ह्यात यापूर्वी एकूण १२ आरोपी अटक करण्यात आलेले आहेत. त्यात दोन डॉक्टर, चार एजंट व सहा संबंधित गर्भवती महिलांचे कुटुंबीय यांचा समावेश आहे. गुन्ह्याचा बारकाईने तपास करीत असताना बेकायदेशीर गर्भपात करण्यासाठी लागणाऱ्या गोळ्या या श्रीरामपूर येथील डॉ. राज अजीज शेख हा पुरवत असल्याचे समोर आले. त्यानुसार पहाटे त्यास पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडे विचारपूस केली असता त्याने बेकायदेशीर गर्भपाताच्या गोळ्या पुरवल्याचे कबूल केले आहे. त्यानुसार या गुन्ह्यामध्ये डॉ. राज अजिज शेख (रा. वार्ड क्रमांक २) यास पहाटे अंटक करण्यात आली. त्याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दोन दिवसांची पोलिस कोठडी दिली. आजआखेरपर्यंत या गुन्ह्यात एकूण १३ आरोपी अटक आहेत. गुन्ह्याचा बारकाईने तपास सुरू आहे. गर्भलिंग निदान केलेल्या महिलांची माहिती घेऊन पुढील तपास करण्यात येत आहे, तसेच गर्भलिंग निदानासाठी बेकायदेशीरपणे मशीन कोठून खरेदी केले, त्यासाठी एजंट कोण त्याचीही माहिती प्राप्त झाली असून त्यांनाही ताब्यात घेण्यासाठी पथक रवाना झाले आहे.













दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25